लोकमत

# सहकारी बँकांच्या वृद्धीसाठी केंद्रीय पातळीवर प्रयत्न करणार

## केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. कराड : ८० टक्के प्रश्न रिझर्व्ह बँकेशी संबंधित

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : नागरी सहकारी बँकांचे अनन्यसाधारण महत्त्व असून ग्रामीण आणि शहरी स्तरावर तळागाळातील सर्वांना सहज कर्ज उपलब्ध करून देणे किंवा तळागाळातील सर्वसामान्यांना बचतीच्या सवयी लावणे यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. अशा पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँका कशा टिकतील, कशा वाढतील आणि कशा सक्षम होतील या दृष्टीने केंद्र सरकारतर्फे संवादाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, असा शब्द केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी आज दिला.

संवाद पुणेतर्फे रविवारी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्याशी मुक्त संवाद आणि त्यांच्या विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. भागवत कराड बोलत होते. यावेळी बँकिंग क्षेत्राशी संबंधित वार्तालापाचेदेखील आयोजन करण्यात आले होते.

### रुपीच्या विलीनीकरणाचा यशस्वी प्रयत्न करू

रुपी बँकेचे महाराष्ट्रातील बँकेमध्येच यशस्वीरीत्या विलीनीकरणासाठी आम्ही सर्व ते प्रयत्न करीत असून, ते नक्कीच यशस्वी होतील, असे आश्वासन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी दिले. रुपी बँकेचे प्रशासक सुधीर पंडित यांनी रविवारी डॉ. भागवत कराड यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी हे आश्वासन दिले. प्रशासक म्हणून सुधीर पंडित यांनी केलेल्या विशेष कार्याची दखल घेऊन डॉ. कराड यांनी पंडित यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्याशी रुपी बँकेच्या विलीनीकरणाबाबत वेळोवेळी चर्चा झाली असून, या विलीनीकरणाकडे आपले लक्ष आहे. रुपी बँकेचे सारस्वत बँकेत विलीनीकरण करण्यासाठी सर्व ते प्रयत्न करेन, असे डॉ. कराड यांनी सांगितले.

कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य सरकारी परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनासकर, पुणे जिल्हा नागरी बँक असोसिएशनचे सुभाष मोहिते, संवाद पुणेचे सुनील महाजन, सचिन ईटकर आणि भरत गीते उपस्थित होते.

डॉ. भागवत कराड म्हणाले की, देशातील बँक व्यवहाराचे स्वरूप बदलत चालले आहे. नवीन पिढी डिजिटलायझेशन मुळे ऑनलाईन व्यवहाराला प्राधान्य देत आहे. बँकांचे जेवढे डिजीटलायझेशन होईल तेवढे व्यवहार पारदर्शक होतील आणि बँकिंग क्षेत्रातील भ्रष्टाचाराला आळा बसेल. एकीकडे बँकांचे होणारे डिजिटलायझेशन आणि तळागाळापर्यंत बँकिंग सेवा पोहोचविण्यासाठी केंद्र सरकारची कटिबद्धता या दोन्हींचा सुवर्णमध्य साधत धोरण आखावे लागेल. सहकारी बँकेचे ८० टक्के प्रश्न हे रिझर्व्ह बँकेशी संबंधित आहेत. त्याबाबत राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्र आयोजित करून ते सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.

विद्याधर अनासकर यांनी रिझर्व्ह बँकेकडून असलेल्या अपेक्षा आणि सहकारी बँकांच्या अडचणींवर विस्ताराने ऊहापोह केला.

सचिन ईटकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले.

Pune Main
Page No. 2 Jan 10, 2022
Powered by: erelego.com